सरपंच पदाची आरक्षण सोडत

यावल : ५० टक्के महिलांना संधी

यावल । प्रतिनिधी

तालुक्यातील ६७ ग्रामपंचायती पैकी ६३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठीची आरक्षण सोडत दिनांक ८ जुलै रोजी मंगळवारी काढण्यात आली. दोन सत्रात जाहिर करण्यात आलेल्या आरक्षणात ५० टक्के जागेवर महिलांना संधी देण्यात आली आहे. येथील तहसिल कार्यालयाच्या सभागृहात सदर आरक्षण सोडत कार्यक्रमात मोठया संख्येत नागरीक सह राजकिय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

तालुक्यात एकुण ६७ ग्रामपंचायती आहेत. यातील ४ ग्रामपंचायती या पेसा क्षेत्र म्हणुन घोषीत असुन तेथील जागा अनुसुचित जमाती करीता आरक्षीत आहे. तेव्हा उवर्रित ६३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण मंगळवार दिनांक ८ जुलै रोजी येथील तहसिल कार्यालयात दोन सत्रात जाहिर करण्यात आले. सकाळच्या सत्रात तहसिलदार मोहनमाला नाझीरकर यांनी एकुण ६३ ग्रामपंचायतीत ८ जागा अनुसुचित जातीसाठी, २१ जागा अनुसूचित जमातीसाठी तर १७ जागा इतर मागास प्रवर्ग आणी १७ जागा सर्वसाधारण करीता आरक्षण जाहिर केले. तर दुपारी २ वाजे पासुन प्राताधिकारी बबन काकडे यांनी या सर्व ६३ ग्रामपंचायतीत विविध प्रवर्गा सह एकुण महिलांसाठीच्या ३३ जागेवरील आरक्षण जाहिर केले.सदर प्रक्रीये करीता निवडणुक नायब तहसिलदार शैलेश तरसोदे, नायब तहसिलदार अतुल गांर्गुडे, सुयोग पाटील यांनी कामकाज पाहिले. तर विविध आरक्षण संर्दभातील इश्वर चिठ्ठी मोहंमद अली अन्सार खाटीक या बालीकाच्या हाताने काढण्यात आल्या. सकाळ पासुनचं या आरक्षण सोडत करीता नागरीकांनी तहसिल कार्यालयात गर्दी केली होती.

असे आहे आरक्षण– अनुसुचित जमाती राखीव – बोराळे, वड्री खुर्द, कोसगाव, सांगवी खुर्द, पिळोदे खुर्द, पाडळसे, साकळी, हंबर्डी, पिळोदे बुद्रुक, राजोरे. अनुसुचित जामाती महिला राखीव– कोरपावली, म्हैसवाडी, कासवे, शिरसाड, मनवेल, मारूळ, बामणोद, विरोदे, बोरावल खुर्द, चिखली बुद्रुक, चितोडे. अनुसुचित जाती राखीव :– निमगाव, किनगाव बुद्रुक, मोहराळे, डांभुर्णी. अनुसुचित जाती महिला राखीव – वनोली, दुसखेडे, न्हावी, अंजाळे. नामाप्र – भालशिव, हिंगोणे, आमोदे, नायगाव, सातोद, कासारखेडा, किनगाव खुर्द, विरावली. नामाप्र महिला राखीव – दहीगाव, भालोद, चुंचाळे, गिरडगाव, पिंप्री, उंटावद, वढोदे प्र.सावदा, कोळवद, महेलखेडी. सर्वसाधारण– चिखली खुर्द, चिंचोली, शिरागड, बोरखेडा बुद्रुक, सावखेडेसिम, थोरगव्हाण, पिंपरूड, टाकरखेडे. सर्वसाधारण महिला राखीव – अट्रावल, डोंगरकठोरा, सांगवी बुद्रुक, डोणगाव, नावरे, कोळन्हावी, वढोदे प्र.यावल, बोरावल बुद्रुक, आडगाव.

पारोळा तालुक्यातील ८४ ग्रा.पं.चे सरपंच आरक्षण

पारोळा । प्रतिनिधी

तालुक्यातील ८४ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत तहसील कार्यालय येथील सभागृहात पार पडली, यासाठी प्रांत मनीषकुमार गायकवाड, नायब तहसीलदार श्रीमती आश्विनी मराठे, महसूल सहायक गोकुळ शिसोदे,अमोल शिरसाठ उपस्थित होते.

दुपारी २ वाजता प्रांत मनीषकुमार गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली सरपंच आरक्षण सोडत काढण्यात आली. यासाठी मनश्री शशिकांत परदेशी वय ८ वर्षे हिच्या हस्ते आरक्षण सोडत चिठ्ठ्या काढण्यात आल्यात. पारोळा तालुक्यातील ८४ ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात आले.

सर्वसाधारण–हिवरखेडे सिम (यापूर्वीच आरक्षण निश्चित), भोंडणदिगर–स्त्री, विचखेडे–स्त्री, पिंपळकोठे–स्त्री, देवगाव–स्त्री, ढोली–स्त्री, मुंदाणे प्र.अ.–स्त्री, बाहुटे–स्त्री, बोदर्डे–स्त्री, लोणी खु–स्त्री, पळासखेडे सिम–स्त्री, वेल्हाणे खु–स्त्री, शेळावे बु–स्त्री, बाभळेनाग–स्त्री, वाघरे–स्त्री, करंजी बु–स्त्री, तरवाडे खु–स्त्री, सावळखेडे– स्त्री, उंदिरखेडे–स्त्री, इंधवे–स्त्री, चिखलोड बुद्रुक–जनरल, सावखेडे मराठ–स्त्री, कराडी–जनरल, करमाड बुद्रुक–जनरल, विटनेर–जनरल, सांगवी–जनरल, मुंदाणे प्र. ऊ– जनरल, भिलाली–स्त्री, तरडी–जनरल, सुमठाणे–जनरल, दळवेल–जनरल, राजवड–जनरल, आंबा पिंपरी–जनरल, मेहु–जनरल, मोंढाळे प्र.ऊ–जनरल, कंकराज–जनरल, कोळपिंपरी– जनरल, पोपटनगर– जनरल, मोहाडी–जनरल, सावखेडे तुर्क–स्त्री, वसंतनगर–जनरल, कन्हेरे –जनरल, उडणी दिगर–जनरल, हिरापूर–जनरल, बोळे–जनरल, जिराळी–जनरल.

अनुसूचित जाती– सबगव्हाण प्र.अ– स्त्री, तामसवाडी–स्त्री, चोरवड–जनरल, बहादरपुर–जनरल. अनुसूचित जमाती– टेहू–जनरल, म्हसवे– जनरल, वसंतवाडी–जनरल, शेवगे प्र.ब–जनरल, शिवरेदीगर–जनरल, टोळी–स्त्री, जोगलखेडे–स्त्री, पळासखेडे बु–स्त्री, शिरसमणी–स्त्री, सार्वे बु–स्त्री, आडगाव–स्त्री.

नागरिकांचा मागास प्रवर्ग– मोंढाळे प्र.अ.(पूर्वीचे आरक्षण कायम), धुळपिंप्री– स्त्री, भोकरबारी–स्त्री, खोलसर–स्त्री, करमाड खु–स्त्री, सावखेडे होळ–स्त्री, शेवगे बु.–स्त्री, नगांव–स्त्री, मोरफळ– जनरल, रत्नापिंप्री–जनरल, टिटवी– जनरल, चहुत्रे–जनरल, शिरसोदे –जनरल, खेडीढोक–जनरल, पिंप्री प्र. उत्राण–जनरल, भोलाणे–जनरल, शेळावे खु.–जनरल, मंगरुळ–जनरल, हनुमंतखेडे–स्त्री, महाळपूर –स्त्री, रताळे– स्त्री, लोणी सिम–स्त्री, लोणी बुद्रुक– स्त्री, वरील प्रमाणे पारोळा तालुक्यात ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण काढण्यात आले आहे.

या कामी पहिल्या सत्रात तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण विगतवारी काढण्यात आली होती. दुपारच्या सत्रात एरंडोल उपविभागीय महसूल अधिकारी मनीष कुमार गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ८४ ग्रामपंचायत सरपंच आरक्षण काढण्यात आले. दोघेही प्रक्रियेमध्ये मनश्री शशिकांत परदेशी व आठ वर्ष या विद्यार्थिनीने चिठ्ठ्या काढल्या. याप्रसंगी नायब तहसीलदार अश्विनी मराठे हे उपस्थित होते त्यांना अमोल शिरसाठ यांनी सहकार्य केले.

पाचोरा : ५२ ग्रामपंचायतींवर महिलाराज

पाचोरा । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी यांच्या ३० जून २०२५ च्या आदेशान्वे ८ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता पाचोरा तालुक्यातील १०० ग्रामपंचायतीसाठी आरक्षण सोडत शहरातील माजी आमदार आर ओ पाटील व्यापारी संकुल येथे तहसीलदार विजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. पाचोरा तालुक्याचे तहसीलदार विजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली १०० ग्रामपंचायतीची अनु जाती,अनु. जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण महिला सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

आरक्षण सोडत सभा दुपारी दोन वाजता उपविभागीय अधिकारी भुषण अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. व निश्चित केलेल्या सरपंच पदातून अनुसुचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नामाप्र महिला,व सर्व साधारण महिला, आरक्षण थेट सोडतीने निश्चित करण्यात आले श्री भुषण अहिरे उपविभागीय अधिकारी पाचोरा भाग पाचोरा यांच्या अध्यक्षतेखाली उक्त नुमद केल्या त्यानुसार पाचोरा तालुक्यातील एकुण १०० ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण स.न.२०२५–२०३० या कालावधीसाठी निश्चित करण्यात आले. १०० पैकी ५२ ग्रामपंचायतींवर महिलाराज असणार आहे.

या आरक्षणाच्या सोडतीत अनुसूचित जाती साठी ४ , अनुसूचित जमाती ६, नामाप्र १४ सर्वसाधारण महिला २८ असे आरक्षण सोडतीने निश्चित करण्यात आले.

अनुसूचित जाती साठी महिला राखीव, खडकदेवळा खुर्द, पिंप्री बु प्र पा., वेरुळी बु, दुसखेडा, तसेच अनुसूचित जमातीसाठी, म्हसास, लोहारी बु, वाणेगाव, पिंपळगाव बु, बदरखे, सावखेडा बु, तर नामाप्र महिला भोजे, वाघुलखेडा, वडगांव अंबे, अट्टल गव्हाण, तारखेडा बुद्रुक, शिंदाड, जारगांव, सामनेर, गाळण खुर्द,नाईकनगर, वेरूळी खुर्द, खडकदेवळा बुद्रुक, साजगाव, या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. ५५ सर्वसाधारण जागांपैकी महिला सरपंच पदासाठी २८ जागा महिलांसाठी त्यात भातखंडे खुर्द, भोकरी, चिंचखेडा खुर्द, दिघी, होळ, गोराडखेडा खुर्द, भोरटेक, कळमसरा, कासमपुरा, खाजोळा, खेडगाव नंदिचे, कुऱ्हाड बुद्रुक, लासगांव,लोहारा, नगरदेवळा, नेरी, परधाडे, पिंपळगाव खुर्द, पिंप्री खुर्द प्र.पा.राजुरी बुद्रुक, रामेश्वर, सांगवी प्र.लो. सातगाव डोंगरी, शहापुरा, शेवाळे, वरखेडी बुद्रुक, वडगांव खुर्द प्र.पा.वरसाडे प्र बो. तर सर्वसाधारण २७ जागा राहणार आहेत. यामुळे तालुक्यात कही खुशी कही गम अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या सरपंच आरक्षण सोडतीसाठी तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतीच्या भावी सरपंचांनी हजेरी लावली होती.

रावेर : ओबीसी जागांचा कोटा १५ वरून २२

रावेर । प्रतिनिधी

४२ ग्रामपंचायतींवर महिलाराज

सरपंच पदाच्या फेर आरक्षणानंतर नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या १५ जागांवर निघालेले आरक्षण, नव्याने २२ जागावर निश्चित करण्यात आले आहे.तसेच तालुक्यातील ८२ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या फेर आरक्षणानंतर ४२ ग्रामपंचायतीवर महिलाराज येणार आहे.आरक्षणानंतर कही ख़ुशी कही गम अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेकांच्या पदरी निराशा तर अनेकांना सरपंच पदाचे डोहाळे लागले आहे.

येथील तहसील कार्यालयात मंगळवारी फैजपूर उपविभागीय अधिकारी बबनराव काकडे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच पदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी तहसीलदार बी.ए.कापसे, निवासी नायब तहसीलदार संजय तायडे यांची उपस्थिती होती. तालुक्यातील पेसा क्षेत्रातील १३ ग्रामपंचायती वगळून ८२ ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. यात १३ ग्रामपंचायती अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असून पाडळे खुर्द, खिरोदा प्र.रावेर, कुंभारखेडा, वाघोदा खुर्द, खानापूर, मांगी चूनवाडे, कळमोदा, सावखेडा बुद्रुक, मुंजलवाडी, गहूखेडा, मस्कावद खुर्द, भामलवाडी, धामोडी, विवरे खुर्द यापैकी विवरे खुर्द, कुंभारखेडा, मांगी चुनवाडे, सावखेडा बुद्रुक, धामोडी, कळमोदा, खानापूर सरपंचपद महिलांसाठी राखीव आहे.

अनुसूचित जमाती प्रवागार्साठी ११ ग्रामपंचायती राखीव आहे. यात चिनावल, मस्कावदसीम, भोर, सूदगांव, कोचुर बुद्रुक, निरूळ, थेरोळे, नेहते, पुनखेडा, वाघोड, यातील चिनावल भोर, कोचुर बुद्रुक, दोधे, थेरोळे, वाघोड सरपंचपद महिलांसाठी राखीव आहे.

ओबीसी प्रवर्गासाठी २२ जागा राखीव आहे. यात उटखेडा, वाघोदा बुद्रुक, कर्जोद, रणगांव, तासखेडा, अहिरवाडी, सुनोदे, रमजीपूर, आंदलवाडी, वाघाडी, अजनाड–चोरवड, थोरगव्हाण, खिर्डी खुर्द, खिर्डी बुद्रुक, विवरे बुद्रुक, निंभोरा बुद्रुक, अजंदे, धूरखेडा, दसनूर, सिंगत, गौरखेडा, बलवाडी, यातील ११ जागां महिलांसाठी राखीव आहे. त्यात रणगांव, रमजीपूर, अहिरवाडी, आंदलवाडी, उटखेडा, खिर्डी खुर्द, निंभोरा बुद्रुक, धुरखेडा, तासखेडा, अजनाड–चोरवड, गौरखेडा यांचा समावेश आहे.

३६ सरपंचपदे सर्वसाधारण आहे. यात भाटखेडा, खिरोदा प्र.यावल, रसलपूर, निम्बोल, बक्षिपूर, मोरगांव बुद्रुक, भोकरी, कोळदा, पुरी–गोलवाडे, केऱ्हाळे खुर्द, नांदूरखेडा, सावखेडा खुर्द, वडगांव, केऱ्हाळे बुद्रुक, उद खुर्द, रोझोदे, विटवा, तांदलवाडी, तामसवाडी, ऐनपूर, उदळी खुर्द, शिंगाडी, मस्कावद खुर्द, मोरगांव खुर्द, खिरवड, अटवाडे, गाते, पातोंडी, कोचुर खुर्द, मांगलवाडी, सुलवाडी, रेन्भोटा, निंभोरासीम, कांडवेल, सिंदखेडा, रायपुर, यातील १८ ग्रामपंचायती महिलांकरिता राखीव आहे. यात कोचुर खुर्द, उदळी खुर्द, निम्बोल, भोकरी, मस्कावद खुर्द, रोझोदा, रायपुर, शिंगाडी,गाते, विटवा, सिंदखेड, बक्षिपूर, मोरगांव बुद्रुक, सावखेडा खुर्द, कोळदा, पुरी–गोलवाडे, वडगांव, ऐनपूर या गावांचा समावेश आहे.

मुक्ताईनगर : महिलांना ५० टक्के जागा; राजकीय हालचालींना वेग

मुक्ताईनगर । प्रतिनिधी

मुक्ताईनगर तालुक्यातील ६१ ग्रामपंचायतींसाठी राज्य शासनाने २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी सरपंच पदाच्या आरक्षण यादीची घोषणा केली असून, यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) आणि सर्वसाधारण गटांमध्ये महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. त्यामुळे कही खुशी कही गम अशी परिस्थिती आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीसंदर्भातील तयारी अंतिम टप्प्यात असताना या आरक्षण यादीने राजकीय हालचालींना वेग आला आहे. अनेक गावांमध्ये महिला सशक्तीकरणाचा उत्सव साजरा होताना दिसत आहे, तर काही ठिकाणी सत्ताधाऱ्यांची गणितं कोलमडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अनुसूचित जातींसाठी आरक्षण– तालुक्यातील एकूण ८ ग्रामपंचायती सरपंच पदासाठी अनुसूचित जाती गटात आरक्षित करण्यात आल्या आहेत, त्यातील ४ जागा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव आहेत.

आरक्षित ग्रामपंचायती (SC): १. बेलसवाडी–अनुसूचित जाती महिला २. राजुरे–अनुसूचित जाती ३. शेमळदे–अनुसूचित जाती ४. हिवरे–अनुसूचित जाती ५. इच्छापूर–अनुसूचित जाती महिला ६. हरताळे–अनुसूचित जाती महिला ७.खामखेडे–अनुसूचित जाती ८.चिंचोल–अनुसूचित जाती महिला

अनुसूचित जमातींसाठी आरक्षण :तालुक्यात एकूण ११ ग्रामपंचायती अनुसूचित जमाती गटासाठी आरक्षित असून, त्यापैकी ६ ग्रामपंचायती महिला आरक्षणाखाली आहेत.

आरक्षित ग्रामपंचायती (ST): १.चांगदेव–अनुसूचित जमाती महिला २.अंतुली – अनुसूचित जमाती ३.धामणगाव–अनुसूचित जमाती महिला ४.रुडखेडा–अनुसूचित जमाती ५. पारंबी–अनुसूचित जमाती महिला ६. निमखेडी खु.–अनुसूचित जमाती ७. कुन्हा–अनुसूचित जमाती महिला ८.टाकळी–अनुसूचित जमाती महिला ९. भांटा–अनुसूचित जमाती १०.मेहुण–अनुसूचित जमाती ११. हलखंडा – अनुसूचित जमाती महिला.

नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) आरक्षण – या गटासाठी १६ ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण लागू करण्यात आले असून त्यापैकी ८ महिलांसाठी राखीव आहेत.

प्रमुख ग्रामपंचायती (OBC): १.दुई–महिला २.काकोडा–महिला ३.तरोडा–महिला ४. सुकळी–पुरुष ५.चिखली–महिला ६.बोरखेडा–पुरुष ७.कान्हाळा–पुरुष ८.सारोळा–महिला ९.नांदवेल–महिला १०.पंचाणे–पुरुष ११.पातोंडी–पुरुष १२.चारठाणे–महिला १३.मानेगाव–पुरुष १४. वायला–पुरुष १५.वढवे–महिला १६.माळेगाव–पुरुष.

सर्वसाधारण प्रवर्ग – या गटात एकूण २६ ग्रामपंचायतींना आरक्षण देण्यात आले असून, त्यात १२ महिला आरक्षणाखाली आहेत. महिला आरक्षित: माढळद, नरवेल, चिंचखेडे बु., सातोड, लोहारखेडे, बोदवड, पिंप्रीपंचम, येरोळा, सुळे–रिगाव, जॉचणखेडा, पिप्रीअकाराऊत, कको, कोथळी

इतर: घोडसगाव, चिंचखेडा खु., पिंप्राळा, महालखेडा, मेळसांगवे, पिप्रीनांद, पुरनाड, उचंदा, नायगाव, धामणदे, निमखेडी बु., वढादा. राजकीय हालचालींना वेग: या आरक्षण यादीमुळे अनेक ठिकाणी सरपंचपदासाठी इच्छुकांनी नव्याने रणनीती आखायला सुरुवात केली आहे. महिलांसाठी आरक्षण पाहता, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा प्रभाव वाढण्याची शक्यता अधिक आहे. काही गावांमध्ये पुरुष उमेदवारांच्या अपेक्षांना रूम लागल्याचे चित्र आहे. आरक्षणाच्या यादीमुळे अनेकांना झटका बसला आहे.

होमिओपॅथी डॉक्टरांच्या बाबतीतील निर्णय मागे घ्या; अन्यथा ११ जुलैपासून एमबीबीएस डॉक्टरांचा संप

रावेर । प्रतिनिधी

एमएमसी हि संस्था एमबीबीएस व त्यावरील उच्च पदवी मिळवणाऱ्या डॉक्टरांच्या नोंदणीसाठी स्थापन झालेली संस्था आहे.सरकारच्या नव्या निर्णयाने वादाला तोंड फुटले असून, या संस्थेत होमिओपॅथी डॉक्टरांची नोदणी करण्याचा निर्णय धक्कादायक तितकाच ॲलोपॅथिक वैद्यकीय व्यवसायातील मानके मोडणारा आहे.हा निर्णय सरकारने मागे घ्यावा अन्यथा दि.११ जुलै रोजी सर्व डॉक्टर संप पुकारणार असल्याचा निर्वाणीचा इशारा रावेरात आयएमए संघटनेकडून प्रशासनाला देण्यात आला आहे.याबाबत तहसीलदार बी.ए.कापसे यांना निवेदन देण्यात आले सदरील निवेदन निवासी नायब तहसीलदार संजय तायडे यांनी स्वीकारले.

या निवेदनात म्हटले आहे कि,महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने दि.३० जून रोजी रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात सर्टिफिकेटो कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर्सना एमएमसी अंतर्गत नोंदणी करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला गेल्याने, हा निर्णय सर्व वैदकीय तज्ञांना बुचकळ्यात टाकणारा आहे. आधुनिक (ॲलोपॅथिक) वैद्यकीय प्रॅक्टिसच्या पावित्र्यासाठी, मानकांसाठी आणि नियमनासाठी देखील हानिकारक आहे.या निर्णयामुळे आधुनिक वैद्यक व्यवसायिकांना प्रचंड त्रास होईल. एमएमसी ही एक वैधानिक संस्था आहे,जी केवळ आधुनिक औषधात वैध एमबीबीएस आणि उच्च पदवी धारण करणाऱ्या ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या नोंदणी, नियमन आणि नैतिक देखरेखीसाठी स्थापन करण्यात आली आहे. होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर्स हे पूर्णपणे वेगळ्या वैद्यकीय प्रवाहाचे आहेत आणि महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल या वेगळ्या संस्थेद्वारे त्यांची नियुक्ती केली जाते.सी.सी.एम.पी.हा एक अल्पकालीन, १ वर्षाचा अभ्यासक्रम आहे आणि तो कठोर, दीर्घ कालावधीच्या एमबीबीएस शिक्षण आणि क्लिनिकल प्रशिक्षणाशी समतुल्य होऊ शकत नाही. होमिओपॅथिक डॉक्टरांना एमएमसीमध्ये पार्श्विक प्रवेश देणे हे कौन्सिलचे पावित्र्य आणि विश्वासार्हतेला धक्का पोहचवणारे असून सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण करू शकते. होमिओपॅथीचा एक वेगळी वैद्यकीय व्यवस्था आहे. त्यांच्या डॉक्टरांनी त्यांच्या स्वतःच्या नियामक चौकटीत प्रॅक्टिस करणे सुरू ठेवावी.कौन्सिलमध्ये पूर्णपणे वेगळ्या प्रवाहातील डॉक्टरांचा हा क्रॉसओव्हर शिस्त, मानके आणि ॲलोपॅथिक वैद्यकीय व्यवसायावरील जनतेच्या विश्वासाला थेट धोका निर्माण करत आहे.

याबाबत तत्काळ हस्तक्षेप करून हा मागे घ्यावा. होमिओपॅथिक डॉक्टर त्यांच्या स्वतःच्या कौन्सिल अंतर्गत राहतील आणि त्यांना एमएमसी अंतर्गत नोंदणी करण्याची परवानगी देण्यात येवू नये असे म्हणण्यात आले आहे. याबाबत शासनाने ११ जुलै पर्यंत निणर्य न घेतल्यास सेवा बंद संप पुकारणार असल्याचा निर्वाणीचा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. याकाळात फक्त इमर्जन्सी सेवा सुरु राहणार असल्याचे आयएमए संघटनेच्या सचिव डॉ.सुचिता कुयटे सांगितले. यावेळी डॉ.सौ.सुचिता कुयटे, डॉ.सौ.प्रीती सावळे, डॉ.सौ संध्या वानखेडे, डॉ.सौ.हर्षा पाटील, डॉ.सौ.चैताली महाजन, डॉ.सौ.अमिता महाजन,डॉ.डिगंबर पाटील, डॉ.मिलिंद वानखेडे, डॉ.भगवान कुयटे, डॉ.ताराचंद सावळे,डॉ.मिलिंद वानखेडे, डॉ.प्रवीण चौधरी, डॉ.योगेश महाजन उपस्थित होते.

विठ्ठल मंदिरात विभागीय आयुक्त चित्रा कुलकर्णी यांच्या हस्ते महापूजा

चोपडा । प्रतिनिधी

तालुक्यातील वढोदा येथील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त रविवारी सकाळी ८ वाजता नाशिक येथील सेवा हमी हक्क विभागाचे विभागीय आयुक्त सौ.चित्राताई कुलकर्णी व त्यांचे पती तथा पुणे येथील कर सल्लागार विकास कुलकर्णी यांच्याहस्ते विठ्ठलाची महापूजा करण्यात आली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, अमळनेर विभागाचे प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे, पत्नी सौ.कुमुदताई मुंडावरे, आई श्रीमती विजयाताई मुंडावरे, सुकन्या ज्ञानेश्वरी, तहसीलदार भाऊसाहेब थोरात उपस्थित होते.

याप्रसंगी माजी आमदार कैलास पाटील, चोसाकाचे चेअरमन चंद्रहास गुजराथी, माजी चेअरमन ॲड.घनश्याम निंबाजी पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती गोकुळ पंढरीनाथ पाटील, नगरपालिकेचे माजी गटनेते जीवन चौधरी बाजार समितीचे माजी सभापती गिरीश पाटील, माजी उपसभापती नंदकिशोर पाटील, पीपल्स बँकेचे संचालक नेमीचंद जैन, कुसुंबे येथील मणिलाल पाटील, वढोदा येथील आदर्श शेतकरी मंगल फकिरचंद पाटील, सुभाष फकिरचंद पाटील, प्रकाश रूपसिंग पाटील यांचेसह चोपडा तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दामिनी पथकाकडून विद्यार्थिनींची जनजागृती

धरणगाव । प्रतिनिधी

शहर व तालुक्यातील शाळा व कॉलेज मध्ये मुली व युवतींना रोड रोमियोंकडून त्रास होऊ नये. त्यांना गुड टच बॅड टच कळावे यासाठी धरणगाव पोलीस ठाणे मार्फत दामिनी पथक जनजागृती करीत आहे. याबाबत विद्यार्थीनी, पालक, नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

धरणगाव शहरातील सर्व शाळा कॉलेजेस व बस स्थानक या ठिकाणी या पथकांकडून पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच रोड रोमियोंकडून त्रास झाल्यास पोलीस स्टेशनला तात्काळ संपर्क करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. या पथकामध्ये हवालदार वर्षा गायकवाड पोलीस कॉन्स्टेबल विनोद चौधरी मनोज पाटील सुमित बाविस्कर यांचा समावेश आहे.